
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

नदी विशेषांक

# तिफण

दिवाळी - २०२३

वर्ष : १४ वे । अंक : तिसरा / चौथा
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३



४२. जीवक, मानवाचे आणि एक जीवन
मांडणारी कादंबरी : नदीष्ट ... २४३

४३. मानवी जीवन संस्कृतीचा अविभाज्य
भाग : नदी... जीवनसरिता ... २४८

४४. गोदाकाठचा अस्सल प्रवास : 'नदीष्ट' ... २५४

४५. मुक्तामायच्या विनाशपर्वाची
कर्मकहाणी ... २५८

४६. नदीची व्यथा मांडणारी कविता :
'मुक्ता मायची कहाणी' ... २६२

४७. महापुराचा सामना करणाऱ्या
शेतकऱ्याची संघर्ष गाथा : पाणीफेरा ... २६७

४८. 'जलसंवाद' या नियतकालिकाचे
'नदी' संवर्धनातील योगदान ... २७१

४९. नदीजोड प्रकल्प : वास्तविकता
आणि आव्हाने ... २७५

५०. 'वारणा' पावसाळ्यात महापुराचे
थैमान का मांडते? ... २८७

५१. महाराष्ट्रातील नदीकाठची
धार्मिक स्थळे ... २९१

५२. पूर्व विदर्भातील
जीवनदायिनी – वैनगंगा ... २९८

५३. भारताचे राष्ट्रीय जल अभियान
आणि नदी प्रकल्प: एक परिचय ... ३०६

५४. गंगा नदी : पौराणिक इतिहास
व सद्य स्थिती

५५. 'भारतातील राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प :
स्वरूप आणि परिणाम'

५६. जीवनदायी गंगा नदी : प्रदूषण आणि
संरक्षण: एक आढावा

५७. मराठी ग्रामीण ललित गद्यातील
नदी : पाणवठ्याकाठच्या संस्कृतीचे
चित्रण

५८. जैवविविधता... एक वरदान

५९. खडकपूर्णा नदीचा उगम व
सामाजिक सांस्कृतिक इतिहास

६०. तीर्थरूपी नदी उगमास

६१. नर्मदेच्या तीरा-तीराने

६२. लढा मुक्ता नदीच्या अस्तित्वाचा


६३. धोरडी नदीचा कायापालट
करणारे जलमित्र : भाऊसाहेब चुंगे

६४. अति धार्मिकता, कर्मकांड आणि
अंधश्रद्धा नद्यांना मारक ठरतात -
एक चिकित्सा (गोदावरी
नदीच्या विशेष अनुषंगाने)

६५. गाव शिवासाठी नदी पणाला लागते

६६. नदी वाचविण्यासाठी कवींचा पुढाकार...



-प्रा.डॉ. कारभारी लक्ष्मण भानुसे, *कन्नड*

*लेखक शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.*

**खडकपूर्णाच्या परिसरात राहणारे लोक हे कृषीप्रधान आहेत. शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. आणि पूर्णा नदीकाठच्या लोकांचा जीवन प्रवास हा खडकपूर्णा नदीच्या उगमामुळे विकसित झालेला आपणास पाहावयास मिळतो. कारण या नदीवर करंजखेड येथील पूर्णानेवपूर प्रकल्प, पुढे मराठवाड्यातील अतिशय भव्य जायकवाडीनंतरचं पाणीसाठा असणार धरण म्हणून प्रचलित असलेलं खडकपूर्णा प्रकल्प. त्यानंतर पुढे येलदरी प्रकल्प. आणि पुढे सिद्धेश्वर प्रकल्प. अशा तीन जलाशयाची निर्मिती झालेली आहे. म्हणूनच खडकपुर्नेला नदी पात्रात कायमच पाणी असते.**

# खडकपूर्णा नदीचा उगम व सामाजिक सांस्कृतिक इतिहास

## प्रस्तावना

महाराष्ट्र हा नद्याचा आणि डोंगर रांगाचा बनलेला असा वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश आहे. म्हणूनच नदांचे मूळ आणि ऋषींचे कुळ पाहू नये अशी एक प्रचलित म्हण आहे. आपल्या हातून चुकी होऊ नये म्हणून हे महाराष्ट्र वाकसंप्रदायकोष मध्ये दिलेलं आहे. (दाते आणि कर्वे १९४२) नदीचे उगमस्त्रोत अनेक असतात. अनेक नद्यांची सुरुवात बारीक बारीक ओहोळ आणि प्रवाह एकत्र येऊन होते. त्यातील काही ओहोळ बारामही वाहतात, तर काही काळ कोरडे सुद्धा पडतात. बऱ्याच नद्यांची उगम स्थान

निश्चितपणे सांगता येत नाही. परंतु अपवादात्मक काही नद्यांच्या बाबतीत मात्र हेच नदीचे उगम स्थान आहे असे सांगता येते. विसेशतहा ते तीर्थक्षेत्र असतेच, म्हणूनच सर्व नद्यांच्या उगम स्थानांना तीर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. देवळे, कुंड, पायऱ्या, आणि तत्सम स्थापत्य रचना बघितली तर, यात्रेकरूंचा विचार करून आणि त्या गोष्टी लक्षात घेऊन रचना केलेली असतेअसे लक्षात येते. जसे त्र्यंबकेश्वराच्या ब्रह्मगिरीवरचा गोदावरींचा उगम, महावळेश्वरचा कृष्णेचा उगम, आणि भीमाशंकरचा भीमेचा उगम यावरून आपल्याला नद्यांच्या उगमांविपयी कल्पना येते. नदीच्या उगमा विषयी अनेक दंतकथा आहेत. जसे की शंकराच्या जटेतील गंगा, ब्राह्मण गौतमाने ब्रह्मगिरीवर गंगा आणणे यासारख्या जातक कथा आहेत. तसेच खडकपूर्णेचा उगमसुद्धा असाच या माहितीप्रमाणे झालेला आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील गौताळा अभयारण्याच्या डोंगर रांगेत कन्नड तालुक्यात रामपूरवाडी पुरंनवाडी यासारख्या गावातून एका छोट्याशा दरीतून तिचा उगम झालेला आहे. उगमाच्या ठिकाणी छोटीशी ओहोळ आहे. तेथे एक छोटी बारव होती. तेथून या नदीचा उगम सुरुवात होते. पुढे ती नागापूर, करंजखेड, चिंचोली, भराडी, भोकरदन, मार्गे ती बुलढाणा जिल्ह्यात आपला प्रवास करते. पुढे ती जाफराबाद देऊळगाव राजा, देऊळगाव मही, सिंदखेडराजा, पुन्हा मराठवाड्यात जिंतूर, परभणी जिल्ह्यात प्रवास करते. आणि नांदेड जिल्ह्यात प्रवास केल्यानंतर ती मराठवाड्याची जीवनदायींनी गोदावरीला मिळते. भारतातील सर्व नद्या ह्या श्रीवाचक नावाने ओळखल्या जातात. गोदावरी, पूर्णा, नर्मदा, कावेरी, गंगा, सिंधू, इंद्रायणी यावरून असे लक्षात येते कि, भारतात मातृसत्ताक कुटुंबपद्धती होती. म्हणूनच नद्यांच्या काठावर मोठ्या प्रमाणात धार्मिक विधी चालतात. आणि सर्व नद्यांच्या काठावर आसरा ही देवीची ठिकाणे आढळतात. ज्याला सप्तमात्रका सुद्धा म्हणतात. प्रत्येक नदीच्या काठावरील परिसरात त्या त्या नदीच्या संदर्भात सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक रूढी परंपरा व प्रथा आहेत. त्यातच मराठवाड्यातून उगम पाहून विदर्भात प्रवेश व नंतर पुन्हा मराठवाड्यात मार्ग क्रमन करणारी खडकपूर्णा नदीचा सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक इतिहास मांडण्याचा प्रयत्न.

**पूर्णा नदीच्या उगमांविपयी**

कन्नड तालुक्यातील गौताळा अभयारण्याच्या डोंगराच्या कुशीतून उगम पावते ते ठिकाण म्हणजे पुरणवाडी रामपूरवाडी होय. पुरणवाडी गावच्या उत्तर भागातून एका डोंगराच्या कुशीतून छोट्याशा ओहोळ द्वारे तिचा उगम झालेला आहे. पूर्णा हे नाव कसे पडले असा प्रश्न नेहमीच सर्वांना पडतो. तर ज्या ठिकाणाहून तिचा उगम होतो त्या उगमाच्या ठिकाणी पुरनेश्वर महादेवाचे मंदिर होते. त्यावरून पूर्णा हे नाव नदीला पडले असावे. जिथून उगम होतो त्या ठिकाणी पूर्वी पुर्नेश्वरान्चे मंदिर होते. त्या ठिकाणी एक दगडी बारव होती. त्या बारवातून पाणी ओव्हर फ्लो होत असे. ते पाणी बाहेर पडण्यासाठी एक दगडी गायमुख सुद्धा होते. आता ते अस्तित्वात नाही. त्या ठिकाणी आता पुरनेश्वरांचे मंदिर मात्र अस्तित्वात आहे. असे ग्रामस्थ सांगतात. पुढे हा प्रवाह जिथून जातो तेथे पुढे रामपूरवाडी गाव लागते. त्या ठिकाणी सुद्धा रामेश्वराचे मंदिर आहे तेथे सुद्धा पूर्णा आपला प्रवास करते. आणि पुढे तो मग नागापूर, करंजखेड, चिंचोली, भराडी, भोकरदन, राजुर. जाफराबाद, देऊळगावमही येथे खडकपूर्णा प्रकल्प. पुढे दुसरबीड, लोणार, मंठा, जिंतूर, पुढे येलदरीधरण पुढे सिद्धेश्वर धरण असा प्रवास करत नांदेड जवळील विष्णुपुरी प्रकल्पाच्या अगोदर गोदावरीला जाऊन मिळते. असा हा खडकपूर्णा नदी मराठवाड्यातून उगम पाहून विदर्भात प्रवास करते. पुन्हा मराठवाड्यात प्रवेश करते. त्यामुळे नदीचे पात्र अत्यंत भव्य असून ही कन्नड भोकरदन देऊळगाव राजा सिंदखेडराजा लोणार व जिंतूर

परभणी व पुढे नांदेड अशा अनेक तालुक्याचा व काही अंशी प्रदेशाची जीवनदायनी ठरली आहे.

**पूर्णा काटची सामाजिक परिस्थिती**

खडकपूर्णाच्या परिसरात राहणारे लोक हे कृषीप्रधान आहेत. शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. आणि पूर्णा नदीकाठच्या लोकांचा जीवन प्रवास हा खडकपूर्णा नदीच्या उगमामुळे विकसित झालेला आपणास पाहावयास मिळतो. कारण या नदीवर करंजखेड येथील पूर्णानेवपूर प्रकल्प, पुढे मराठवाड्यातील अतिशय भव्य जायकवाडीनंतरचं पाणीसाठा असणार धरण म्हणून प्रचलित असलेलं खडकपूर्णा प्रकल्प. त्यानंतर पुढे येलदरी प्रकल्प. आणि पुढे सिद्धेश्वर प्रकल्प. अशा तीन जलाशयाची निर्मिती झालेली आहे. म्हणूनच खडकपुर्नेला नदी पात्रात कायमच पाणी असते. त्यामुळे मत्स्य व्यापार सुद्धा चालतो. उन्हाळ्यामध्ये धरणातून पाणी सोडल्या जाते त्यामुळे नदीपात्राच्या परिसरामध्ये लोकवेगवेगळ्या प्रकारची पिके घेतात. कन्नड परिसरामध्ये अद्रक आणि भाजीपाला घेतात, पुढे लोक कपाशी ऊस मिरची अशी उत्पादने घेतात, तर खडकपूर्णाच्या खाली जिजामाता सहकारी साखर कारखाना होता तो आता बंद आहे. परंतु त्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात उसाची लागवड होत होती. त्याच्याखाली मोठ्या प्रंमाणामध्ये उसाची पिकं घेतली जातात या नदीच्या परिसरामधील कुटुंब पद्धती धार्मिक परंपरासन उत्सव जोपासणारी आहे. या नदीच्या परिसरामध्ये समाजव्यवस्था कुटुंब पद्धती येथील लोकांचा आहार वेशभूषा केशभूषा सौंदर्य साधने मनोरंजनाची साधने आणि येथील समाजाची आर्थिक स्थिती हि मध्य महाराष्ट्राची जाणवते. शेती हा मुख्य व्यवसाय असल्यामुळे लोक कष्टकरी आहेत. आणि त्यामुळे प्रचंड उत्पादन या परिसरातील लोक घेतात. या परिसरामध्ये नदीच्या काठावर धार्मिक उत्सव सुद्धा मोठ्या प्रमाणात चालतात जाफराबाद जवळ देवीचे एक ठाण आहे तेथे साखळ डोहाच्या आसरा म्हणून प्रसिद्ध आहेत. तेथे जावळाचे कार्यक्रम चालतात. तसेच मार्च एप्रिल व मे महिन्यामध्ये धार्मिक उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. पुढे जिथे आमना आणि पूर्णा एकत्र मिळतात त्या संगमावर दहाव्याचे आणि तेराव्याचे कार्यक्रम चालतात. त्याला संगम असे म्हणतात. नदीची पूजा करणारे लोक या परिसरात मोठ्या प्रमाणात आहेत. या नधीचे पाणी श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात लोक महादेवाला टाकण्यासाठी नेतात. खडकपूर्णा या नदीवर चार मोठी माती बंधारे असल्यामुळे या परिसरातील समाजजीवन अतिशय विकसित झालेल आपणास पहावयास मिळते. या नदीमुळे अनेक शहरांचा आणि खेड्यांचा पाण्याचा प्रश्न कायमचा मिटलेला आहे. शेतीचा प्रश्न सुद्धा मिटलेला आहे. या नदीच्या परिसरात ऊस लागवड करणारी शेती मोठ्या प्रमाणात होती. आणि त्यावर जिजामाता सहकारी साखर कारखाना अस्तित्वात होता परंतु तो कित्येक दिवसापासून आता बंद अवस्थेत आहे. याच नदीवर माजी आमदार आप्पासाहेब नागदकर यांच्या नेतृत्वात पूर्णा नेवपूर प्रकल्प तयार होऊन करंजखेड, चिंचोली, नेवपूर हा परिसर पूर्णपणे सिंचनाखाली आल्याचे आपल्याला जाणवत. पुढे भोकरदन तालुक्यामध्येसुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये लोकांची सिंचनाची सोय झालेली आहे. नंतर राजुर या देवस्थानलासुद्धा या नदीपात्रातून पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

पुढे खडकपूर्णा प्रकल्प या नावाने या नदीवर मोठा सिंचन प्रकल्प आहे. या धरणाचे पाणी डाव्या कालव्याद्वारे चिखलीपर्यंत गेले तर उजव्या कालव्याद्वारे मराठवाड्यात शेवलीपर्यंत आलेल आहे. पुढे जिंतूर जवळ येलदरी धरण म्हणून प्रसिद्ध आहे. मोठ्या प्रमाणात या परिसरातील शेती सिंचनाखाली आलेली आहे आणि त्यानंतर काही अंतरावर सिद्धेश्वर नावाचे एक धरण आहे त्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात सिंचनाची सोय झालेली आहे. आणि पुढे ही नदी विष्णुपुरी प्रकल्पाच्या

अगोदर गोदावरीला जाऊन मिळते. या नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाळू उपसा चालतो आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल पहावयास मिळते. नदीचे विद्रोपीकरण झालेले आहे. या नदीतील वाळू ही पूर्व विदर्भात अमरावती पर्यंत नेली जाते आणि मराठवाड्यात सुद्धा आणली जाते. सर्वात मोठं रेतीच पात्र असलेली नदी म्हणून परिचित आहे. तिला खडकपूर्णा असं का म्हणतात तर पुढे वझर सरकटे आणि लोणार च्या परिसरामध्ये ती अतिशय खडकाळ आहे तिथे रेती पहावयास मिळत नाही म्हणून तिला खडकपूरना म्हणत. या नदीवर छोटी छोटी बंधाराने झाल्यामुळे नदीपात्रातील रेतीचे प्रमाण आता कमी होत आहे. खडकपूर्णा नदीच्या संदर्भात अजूनही ग्रामीण भागामध्ये पोवाडे काव्यरचना आणि कथा वेगवेगळ्या सण उत्सवाच्या निमित्ताने सांगितल्या जातात. खडकपूर्णाला १९६४ आणि १९७० मध्ये महापूर आला होता त्या महापुराची काही रचना आणि पोवाडे सुद्धा अस्तित्वात आहेत. ग्रामीण भागात त्याला लोक शिद्रम्याची गाणी म्हणून ओळखतात.


महापुरावरील एक पोवाडा १९७२ सालची हस्तलिखित आहे.

नागापूर पुराना, गावकरी कसूर उगम पुरणाचा भारी, लहानसी खोरी, भरून चालली गिरजा, खेळणा आमना कोसावरी, जी... भरून चालली पूर्णा, जाफराबादच्या किल्ल्यामध्ये पाणी, पडली म्हव्हनी रावजी, जी... हत्तीवर स्वार झाले किल्ल्याचे धनी, कचेरी सुनी, रावजी... गावाबाहेर मुक्कामी जी... पूर्णा तुडुंब भरली नदी, देवा तुझी करणी, जी जी... देऊळघाट परगाना कुणीकडे, हा एकसारवाडी घाटावरती, करतील कहर बेत मुक्कामाचा, काळा टेंभुर्णीची नदी, नेहमीच उन्हाळा पाण्याची सेनगाव ची वखर पूर्वी केला अभिमान बुडविलेजन मेहुण्याचा म्हणतो वठारे पिढीने कान, दाविले रान, जीजी. . . झोटिंगा वाहतो तुंबळ, नीट वाहते पाणी, रात काळ आमना, नदी नियतकाची, केळनदी सुखनाची, पाराखालून येती जी जी जी... कल्याण खडकाची नदी, आटोळगावची रावजी... किनगावची पातळगंगा, केला परतपाळ, तिच्यावर घेती आळ, रावजी... झरी बरामपुरी गाव, दमदम दंडीचावर, खार्लापूर, वळचन पाण्यामध्ये गळती, जीवाला घोर, जाईल घर, रावजी... चिंचखेडची शेतशिवार, गेला वाहून, गव्हाण माहूर, पाणीपुरा मंदिर कल्याण गव्हाण दूर राहिले, सोन्याचे दारबंद रडती लोक जी... गावाच्या वरून धारपडली, गारखेडा टाकरखेडची पुस्ती मंडळी, कितीक लांब जाणं हायजी... गुरूनिमगावचे लोक, झाले कासावीस, नारायणखेड त्यांना कायमचच हास, साटेगावला लागली ठेस, मोठ दिग्रस लहान डिग्रस, झालं कासावीस. वायाळ निमगाव म्हणत गेला गाव कोसाची... हिवरखेडचे गेले झोपडे, आले अंदमान केला वस्तीचा नास, धनगर आळी सर्व खचली नाही राहिला केस, घोंगडीचा जी... पाडळीहुन येती नदी वाहती वाघुरळ, खडकामधला तढेगावचा उतारा नीट, दुःख पोटात जी... लहाने राहिरी मोठी राहिरी तरंगतीवर, भोपळे चारजी... लिंगनाथ देव नदी, दुसरबीड मधी, पोटामध्ये फिरती जवळच्यास बसला धक्का पासून गेले हात पाय दिसेना म्हणते माणसाची... बुधवारच्या दिवशी केला नवस, महापूर आला जी... लोणार परगाण्याची पुराणथळी, ऐका देव खडकीची कथा फुटली पूर्ण कशी झाली, जीवाची व्यथा केली, हरी विठोबा दोघे गुंतले देवीच्या नवसाला, यामध्ये काहीच नाही भावा, चला जाऊ पंढरीला... महापुर आला जी...

**समारोप**

आपल्याला जर महाराष्ट्रातील नद्या जिवंत ठेवायच्या असेल तर, मानवनिर्मित तयार झालेले धोके टाळता आले पाहिजे. कारण निसर्गनिर्मित नद्या आता त्यावर माणसांनी अतिक्रमण केलेले आहे. प्रदूषण, अतिक्रमण, घाण पाणी नाधित सोडणे, वाळू उपसा यामुळे नद्यांना मोठ्या प्रमाणात धोका तयार झालेला

आहे. म्हणूनच देशाच्या पंतप्रधानांना गंगा स्वच्छता अभियान राबवावा लागत आहे. नद्यांच्या काठावर मोठ्या प्रमाणात धार्मिक सण उत्सव साजरे होत असतान ते सुद्धा आता कमी व्हायला लागलेली आहे; कारण पूर्वी बाराही महिने नदीला पाणी वाहत होतो आता पाणी उपसा मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे नद्या कोरड्या पडतात. आणि मोठ्या प्रमाणात वाळूची आणि सिमटांची जंगले तयार होत असल्यामुळे नदीतील वाळू उपसा होतो आहे त्यामुळे दिवसेंदिवस नदीपात्रातील पाणी कमी होत आहे. आणि म्हणून आपण सर्वांनी मिळून नदी संस्कृती नदी बचाव या सर्व यंत्रणांमध्ये सामील झाले पाहिजे. आणि नदीचं सौंदर्य आणि तिचं रूप कस आबादित राहील याच्यासाठी काळजी घेणं अतिशय गरजेचं आहे. पूर्वी नदीपात्रात प्रचंड पाणी असायचं रेती असायची आणि मोठ्या प्रमाणात उंचची उंच अशा दरी आहेत.


पूर्णेश्वर मंदिर

उन्हाळ्यामध्येसुद्धा प्रचंड प्रमाणामध्ये नदीकाठच लोक नदीपात्रात पोहण्यासाठी जात असत. आता मात्र हिवाळ्यातसुद्धा नदीपात्रात पाणी आपल्याला दिसत नाही. म्हणून सर्वच नद्यांची काळजी घेणं अतिशय महत्त्वाचा आहे त्यामुळे कधी महापूर येणं कधी दुष्काळ पडणे तर कधी ढगफुटी होणे हे सर्व मानवनिर्मित झालेला आहे. त्यावर नियंत्रण आणायचं असेल तर माणसाला नद्यांची स्वच्छता आणि नद्यांचा निसर्गनिर्मितपणा आबादीत ठेवणं अतिशय महत्त्वाचा आहे. पूर्णा नदीचे पाणी श्रावण महिन्यामध्ये लोक वेगवेगळ्या मंदिरामध्ये वाहण्यासाठी नेत असतात. त्यामुळे या नदीला सामाजिक धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**संदर्भ**


१) नदी आणि स्त्रीत्व, विजया देव, पद्मगंधा प्रकाशन, २०१४.

२) प्राध्यापक पवार हुकुमचंद, ग्रामस्थ पुरणवाडी, २०२३ चर्चा.

३) शाहीर दिगंबर सोनार, हस्तलिखित पोवाडा.

४) गायधनी विनायक पुरुषोत्तम, परंपवनो गोदावरी उगमापासून संगमापर्यंत.

५) नदिष्ठ, मनोज बोरगावकर.

६) दांडेकर गोपाल निळकंठ, १९५७ कुणा एकाचो भ्रमण गाथा, मौज प्रकाशन.

७) गोऱ्हे चान्द्रशेकर, उगम गोदावरीचा, १९३२.


•••


**-प्रा.डॉ. कारभारी लक्ष्मण भानुसे**

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग

शिवाजी महाविद्यालय, कन्नड.

पत्ता : मोरया पार्क, हर्सूल सी-१२ फेज-३,

जि. छत्रपती संभाजीनगर मो. ९८९०५८८१८९

Email :

karbharibhanuse3@gmail.com